paripatrak

अति.महा.आयुक्त (ज) यांचे कार्यालय
पुणे महानगरपालिका
जावक क्र. अतिमआ(ज)/साप्र/आस्था/७०८९
दिनांक → ११/०१/२०२१

## -: कार्यालयीन परिपत्रक :-

**विषय :- घाणभत्ता वारस करार व अनुकंपा तत्वानुसार नियुक्ती प्रकरणी चारित्र्य व पुर्वचारित्र्य पडताळणीबाबत**

संदर्भ :- १) महाराष्ट्र शासन क्र. सकिर्ण-२००७/पडताळणी-२६, दि.२१ नोव्हेंबर २००७

२) महाराष्ट्र शासन निर्णय क्रमाक: चारित्र्य -२११७/ प्र.क्र.४८३ / २०१७/ १६ - अ, दिनांक २८ ऑगस्ट २०१७.

३) महापालिका आयुक्त ठराव क्र.१/४०१, दि.०४/११/२०२०

पुणे महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील घाणभत्ता अनुज्ञेय असणारे शे.मान्य पदावरील सफाई सेवकांचे सेवानिवृत्त/ऐच्छिक सेवानिवृत्त/शारिरीक दृष्टया अपात्रतेच्या कारणांस्तव सेवानिवृत्त/सेवेत असताना मयत इ.कारणास्तव रिक्त झालेल्या जागी त्यांचे एका पात्र वारसास मा.लाड/पागे कमिटीच्या शिफारशी व त्यानुषंगाने मे.शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या परिपत्रकातील तरतुदीनुसार, तसेच वर्ग-३ व वर्ग-४ मधील सेवेत असताना मयत झालेल्या सेवकांच्या वारसांना अनुकंपा तत्वानुसार वारस नियुक्ती बाबतची कार्यवाही करण्यात येते.

उपरोक्त संदर्भ क्र.१ चे शासन परिपत्रकानुसार महानगरपालिकेच्या सेवेत नियुक्ती करताना उमेदवारांची चारित्र्य पडताळणी यंत्रणेमार्फत करणे अनिवार्य आहे. महानगरपालिका सेवेत नियुक्ती करताना उमेदवाराची चारित्र्य पडताळणी पोलिस यंत्रणेमार्फत करून त्यांच्याविरूध्द कोणतेही गुन्हे नोंदविण्यात आले नाहीत अथवा गुन्हा सिध्द झालेला नाही, असे प्रमाणपत्र पोलीस यंत्रणेकडून प्राप्त झाल्यानंतरच संबंधित उमेदवारांना नियुक्ती द्यावी, असे नमूद करण्यात आले आहे. परंतु सदरचे चारित्र्य पडताळणी पत्र किती वर्ष कालावधीचे असावे याबाबत संदर्भ क्र.१ व २ चे शासन निर्णयात कुठेही उल्लेख दिसून येत नाही.

सद्यस्थितीत नियुक्ती द्यावयाचे उमेदवारांकडून १५ वर्षे कालावधीचे चारित्र्य पडताळणी दाखला मागविणेत येतो परंतु जर नियुक्ती उमेदवारांस वयाच्या २० व्या वर्षी किंवा २२ व्या वर्षी नियुक्ती देण्यात आली/येणार असेल तर १५ वर्षे कालावधीनुसार नियुक्ती उमेदवारांच्या वयाच्या अनुक्रमे ५ किंवा ७ व्या वर्षीपासून चारित्र्य पडताळणी दाखला मागविण्यात येतो, ही बाब योग्य नाही.

चारित्र्य पडताळणी दाखल्यामध्ये नमूद करण्यात आलेला कालावधी हा १५ वर्षापेक्षा कमी असल्याने पुन्हा चारित्र्य पडताळणी दाखला मागविण्यात येतो. सदर कारणास्तव वारस नियुक्ती प्रकरणी कार्यवाही करणेस विलंब होत असल्याने खालीलप्रमाणे निर्देश देण्यात येत आहेत.

paripatrak

घाणभत्ता वारस/अनुकंपानुसार नियुक्ती देण्यात येणाऱ्या उमेदवारांकडून **त्यांच्या वयाच्या १५ वर्षापासून ते नियुक्ती दिनांकापर्यंत** तसेच ज्या नियुक्ती उमेदवारांचे वय ३३ वर्षे ते ४५ वर्षे असेल अशा उमेदवारांकडून **वयाच्या १८ वर्षापासून ते नियुक्ती दिनांकापर्यंत (किमान मागील १५ वर्षाचे )** चारित्र्य पडताळणी प्रमाणपत्र घेण्यात यावे.

तरी घाणभत्ता वारस/अनुकंपानुसार नियुक्ती देण्यात येणाऱ्या उमेदवारांकडून चारित्र्य पडताळणीबाबत वरील आदेशानुसार कार्यवाही करण्यात यावी.

30/12/2020

(रुबल अग्रवाल)
अति.महा.आयुक्त (ज)
पुणे महानगरपालिका

प्रत :-
सर्व खातेप्रमुख व महापालिका सहाय्यक आयुक्त
पुणे महानगरपालिका

यांजकडेस पुढील कार्यवाहीसाठी सादर